क्रमांक-1442/गट-क संयुक्त-दु.नि./2019/तेरा-ब दि. 27 ऑगस्ट, 2019

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## महाराष्ट्र गट-क सेवा (पूर्व) परीक्षा 2019 (जाहिरात क्र. 06/2019)

## "दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क" पदासाठीचा निकाल

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. 16 जून, 2019 रोजी "**महाराष्ट्र गट-क सेवा (पूर्व) परीक्षा 2019**" घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेमधून "**दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क**" पदासाठी विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून **दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क (मुख्य) परीक्षेसाठी** पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दि.27 ऑगस्ट, 2019 रोजी जाहीर करण्यात आला आहे. दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क या पदाकरिता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

2. उपरोक्त निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांना त्यांनी त्यांच्या आवेदनपत्रात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात आले आहे. प्रस्तुत परीक्षेत पात्र ठरलेले जे उमेदवार मुख्य परीक्षेसाठी विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतील व विहित परीक्षा शुल्क भरतील अशाच उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येईल. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

3. मुख्य परीक्षेचा संयुक्त पेपर क्र. 1 दि. 06 ऑक्टोबर, 2019 रोजी घेण्यात येईल.

4. प्रस्तुत निकालाआधारे दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क गट-क पदाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक 1 जुलै, 2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरून प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक 18 ऑगस्ट, 2016 रोजीचे शुध्दीपत्रक व दिनांक 11 मार्च, 2019 रोजीचे शुध्दीपत्रक व तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित "गट-क" पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे म्हणजेच दि. 6 मे, 2019 रोजीचे किंवा तद्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच परीक्षेचा अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीची संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करणे व त्यासंदर्भातील पोचपावती सादर करणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडू उमेदवारांनी संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पात्रतेचा अहवाल कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे बंधनकारक आहे.

5. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

6. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (EWS) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ, दि. 12 फेब्रुवारी, 2019 अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

7. प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरिता स्वीकारार्ह ठरतील.

**ठिकाण : मुंबई** **उपसचिव(परीक्षा-2)**
**दिनांक : 27 ऑगस्ट, 2019** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग**